
साप्ताहिक चपराक
चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष
• वर्ष : १८
• अंक : १०
• पाने : ८
पुणे
मूल्य ६/-
www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner
■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants
For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.

Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. २० ते २६ एप्रिल २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979

# ऑपरेशन लोटस

**ओशोंनी मुल्ला नसरूद्दिनची एक कथा सांगितली होती. एकदा मुल्ला त्याच्या मित्रासोबत गप्पा मारत बसला होता. मस्त मैफिल रंगली. अनेक विषय चर्चेला आल्याने वेळ कसा गेला ते कळलेच नाही. आता रात्र बरीच झाल्याने भूकेची जाणीव झाली. इतक्या रात्री बाहेर जेवण मिळणे कठीण होते. काय करावे, याचे विचारमंथन सुरू असतानाच मुल्ला म्हणाला, ''अरे काळजी कसली करता? माझे घर इथून जवळच आहे. आपण माझ्या घरी जाऊ! माझी बायको आपल्याला काही तरी गरमागरम जेवण तयार करून देईल.''**

सगळे खूश झाले. त्यांनी मुल्लाचं घर गाठलं. त्याच्या घरात अष्टदारिद्य! अन्नाचा कणही नसल्यानं बायको आणि पोरं पाणी पिऊन उपाशी झोपली होती. मुल्लानं आत जाऊन त्याचे मित्र आल्याची वर्दी दिली. 'त्यांना काही तरी खायला करून दे' म्हटल्यावर स्वाभाविकच बायको चिडली. धान्य नाही, भाजीपाला नाही, तेल नाही, तिखट नाही की मिठही नाही. मग यांच्यासाठी काय करणार?

मुल्लालाही वाईट वाटलं. आता काय करणार? तो म्हणाला, ''बाहेर जा आणि माझ्या मित्रांना सांग की मी घरी आलोच नाही.'' बायको बाहेर आली. केविलवाणेपणे तिने मुल्लांच्या मित्राला सांगितलं की, ''हे अजून घरी आले नाहीत!''

मित्र म्हणाले, ''का खोटं बोलताय वहिनी...? मुल्ला आमच्या समोरच घरात गेला.''

मुल्लाच्या बायकोनं पोटतिडिकेनं सांगितलं की, ''अजून हे आले नाहीत. रात्र बरीच झालीय. तुम्ही निघा आता. उद्या त्यांना भेटा.''

मित्र काही ऐकेनात. मुल्ला आपल्या समोरच आत गेलाय हे ते सांगत राहिले. हे सगळं बघून मुल्ला आतून बाहेर आला. अतिशय क्रोधित होत तो म्हणाला, ''माझी बायको मी घरात नाही हे तुम्हाला इतक्या तळमळीनं सांगतेय तर तुम्ही विश्वास का ठेवत नाही? भल्याचा जमानाच राहिला नाही. इतक्या रात्री एखादी महिला इतक्या आर्ततेनं सांगत असेल की तिचा नवरा घरात नाही तर तुम्ही तिच्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे. निघा आता. ती म्हणतेय त्यानुसार उद्या मी आल्यावर मला भेटा...''

मुल्लाची ही गोष्ट आठवण्याचं कारण म्हणजे आपले आजचे सत्ताधारी! 'खोटं बोल पण रेटून बोल' असा राजकारण्यांचा बाणा असतो. 'मी सांगतोय ना हे खरं तर मग ते खरंच! मी जर म्हटलं हे खोटं तर ते खोटंच!!'

त्यांना विरोध करायचा नाही, प्रश्न विचारायचे नाहीत. तुम्ही विरोध केलात तर तुमचं भवितव्य संपलं.

२०१४ पूर्वीचा काळ आठवतोय का? त्यावेळी तेव्हाच्या विरोधी पक्षानं काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरूद्ध जंग जंग पछाडलं होतं. विरोधी पक्ष नेते असलेले देवेंद्र फडणवीस सांगायचे, 'सरकारविरूद्ध माझ्याकडे बैलगाडीभर पुरावे आहेत.' त्यासाठी त्यांनी मुंबईत बैलगाडीही आणली. अजित पवार यांच्यावर सत्तर हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप केला. राज्य सहकारी बँकेचे कर्ज प्रकरण, साखर कारखान्यांचे घोटाळे, पेट्रोलचे वाढते दर, भस्मासूरासारखी जाळत जाणारी महागाई असे किती तरी विषय, किती तरी प्रकरणे... एकदा तर मंत्रालयाला आग लागली होती. बऱ्याच फाईल जळून गेल्या. त्यावेळी याच लोकांनी उपहासानं सांगितलं होतं, 'सगळ्या फाईल जळाल्या. महाराष्ट्र भ्रष्टाचारमुक्त झाला!'



तेलगी स्टॅम्प घोटाळा प्रचंड गाजला. बनावट स्टॅम्प आणि महाराष्ट्र सदन घोटाळ्यावरून छगन भुजबळांच्या विरूद्ध देशभर रान माजवलं. सत्तेत आल्यावर भुजबळांना अटकही केली. पुढं काय झालं? त्याच छगनरावांना मंत्रीमंडळात सहभागी करून घेतलं! ज्या-ज्या नेत्यांवर यांनी टीकेचे प्रचंड घाव घातले, ज्यांचं ज्यांचं राजकीय भवितव्य संपवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले त्या सर्वांना सत्तेत सोबत घेऊन राज्याचा गाडा हाकत आहेत. महाराष्ट्राचा विचार करता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांनी भाजपातल्या किती लोकांना मोठं केलं? विरोधक असोत वा स्वपक्षातले लोक प्रत्येकाचे काही ना काही घोटाळे काढायचे, बेछूट आरोप करायचे आणि त्यांच्या मानेवर त्यांच्या भीतीची टांगती तलवार ठेवून काम पुढे रेटायचं, असाच सारा मामला दिसतोय. विनोद तावडेंना दीर्घकाळ महाराष्ट्रापासून दूर ठेवणं, पंकजा मुंडेचा चिक्की घोटाळा, एकनाथ खडसेंची ससेहोलपट, सुधीर मुनगुंटीवारांकडे दुर्लक्ष, किरीट सोमय्यांचे चावट व्हिडिओ हे सगळं कशाचे निदर्शक म्हणावे?


**संपादकीय**
**घनश्याम पाटील**
**७०५७२९२०९२**


'ब्राह्मण मुख्यमंत्री नको', असा एक विचार मनोज जरांगेचे आंदोलन ऐन भरात असताना पुढे आला होता. त्यावेळी तरुण नेतृत्व म्हणून मराठा समाजाच्या मुरलीधर मोहोळ यांचे नाव पुढे येत होते. देवेंद्र दिल्लीत जाणार आणि मुरलीअण्णा राज्याची सूत्रे सांभाळणार, अशीही चर्चा सुरू झाली. ही चर्चा भरात असतानाच पुण्यातील जैन बोर्डिंगचा विषय पद्धतशीरपणे पुढे आला. तीन हजार कोटींची जमीन गोखले बिल्डरने कवडीमोल भावात घेतल्याचे सांगितले गेले. मुरली मोहोळ जी गाडी वापरायचे तिही एका बिल्डरच्या नावे असल्याचे पुढे आणण्यात आले. '२५-३० वर्षांपूर्वी कुस्तीत मार लागल्याने पायाची शस्त्रक्रिया करून घ्यायची आहे,' म्हणत मुरलीअण्णा दवाखान्यात जाऊन बसले. जैन बोर्डिंगचं पुढं काय झालं? दोषी नेमके कोण? कुणावर काही कारवाई झाली का? या व्यवहाराला स्थगिती दिली गेली असली तरी पुढे काय? हे कुणालाच कळलं नाही.

अशोक खरात प्रकरणात दमानियाबाई रोज नवनवीन विधाने करत होत्या. फोन कॉलचे रेकॉर्ड देत होत्या. त्यांना हे सगळं कोण पुरवत होतं? सामान्य माणूस ही आणि अशी माहिती काढू शकतो का? या प्रकरणात दीपक केसरकरांपासून एकनाथराव शिंदे यांच्यापर्यंत अनेकांची नावे पुढे आली. खरातचे अमित शहा यांच्यासोबतचे फोटो माध्यमात आले. महिला आयोगाच्या अध्यक्षांचा राजीनामा घेतला गेला. नको नको त्या क्लिप व्हायरल झाल्या. नुकतेच खरातचे निकटवर्तीय आणि शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांच्या समृद्धी महामार्गावरील अपघाती मृत्युची बातमी आली. काही दिवसांनी हे सगळं प्रकरण मागे पडेल?

अजितदादा पवार असतानाच पार्थ पवार यांच्यावर आरोप करण्यात आले. मुंढव्यातील अठराशे कोटींची जमीन त्यांच्या अमेडिया या कंपनीने बोगस कागदपत्रे तयार करून घेतल्याचे सांगितले गेले. त्याचं पुढे काय झालं? दादांच्या अपघातप्रकरणी गुन्हा नोंदवला जावा, अशी रास्त मागणी असताना त्याला दाद का दिली जात नाही? रोहित पवार यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी अशी मागणी करत असताना यातील जे काही असेल ते सत्य पुढे येऊ नये असे कुणाला वाटते का?

धनंजय मुंडे यांच्या मागेही चौकशीचा ससेमिरा लावला. विरोधक असोत वा पक्षातले प्रबळ उमेदवार असोत त्या सर्वांना मागे ठेवण्यात एखाद्या नेत्याला यश येत असेल तर हे त्याचे राजकीय कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. आपल्या राज्याला हे असे 'कौशल्य' परवडणारे आहे का? यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार यांचे 'कॉम्बो' म्हणजे देवेंद्र फडणवीस असे सांगितले जाते. मग इतक्या 'धूर्त' नेत्याला राज्यातली गुन्हेगारी का कमी करता येऊ नये? राज्याचं गृहमंत्रीपद सांभाळताना या पदाला ते खरंच न्याय देत आहेत का? ज्याप्रमाणे केंद्रात केवळ आणि केवळ नरेंद्र मोदी हा एकच चेहरा आहे त्याप्रमाणे राज्यात देवेंद्र यांच्याशिवाय दुसरा कोणताही नेता दिसत नाही. हे घडले की घडवून आणले हे सामान्य माणसाला वेगळे सांगायला नकोच. राजकारणातील जपलेली मूल्ये, शिस्त, संघटन, पारदर्शकता, राष्ट्र प्रथम या व अशा शब्दांचा सातत्याने वापर करणाऱ्या भाजपला इतरांपेक्षा वेगळा पक्ष म्हणून ओळखले जायचे. त्यांचे हे धोरण त्यांच्या कृतितून दिसते आहे का? एनकेनप्रकारे विरोधकांना संपवून सर्व संस्था, सर्व महत्त्वाची पदे, सर्व अधिकार आपल्याकडेच मिळवायचे हे सध्याचे 'ऑपरेशन लोटस' आहे का? याचे उत्तर मिळायलाच हवे.







विजयालक्ष्मी मणेरीकर (लक्ष्मीमंगेश)

नाशिक, ९८२२६८३७९९


# द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे!

**आरती प्रभू हे नाव मराठी साहित्यात आणि मराठी वाचकाला अनोळखी नाही. प्रतिभासंपन्न कवी, कादंबरीकार, कथाकार आणि नाटककार म्हणून लोकप्रिय व्यक्तिमत्त्व. खानोलकरांचा जन्म ८ मार्च १९३० आणि मृत्यू २६ एप्रिल १९७६ ला झाला. 'रात्र काळी घागर काळी' ही चि. त्र्यं. खानोलकर (आरती प्रभू) यांची कादंबरी म्हणजे भोवरा निर्माण झालेल्या पाण्यात फसलेल्या स्त्रीची जी मनोवस्था होत असेल असे आयुष्य जगणाऱ्या लक्ष्मीची कथा! 'कसे कसे हसायाचे, हसायाचे आहे मला, ती येते आणिक जाते, गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे,' असे अंतर्यामीची वेदना प्रकट करणारे काव्य लिहिणारे आरती प्रभू यांचा २६ एप्रिल रोजी स्मरणदिन आहे त्यानिमित्त...**

काव्य, कथा, कादंबरी, चित्रपट पटकथा असं सगळ्या प्रकारचं लेखन केलेल्या आरती प्रभूंचं जीवन अतिशय एकांतवासी, एककल्ली, उदास होतं. प्रतिभेचा जिवंत झरा बुद्धितून अखंड वाहत होता. महादेवाच्या जटेतून वाहणाऱ्या गंगाजळीसारखा! उच्चतम साहित्याची अखंड निर्मिती त्यांच्याकडून झाली. त्यांना जाऊन पन्नास वर्षे झाली. आजही त्यांच्या लिखाणातील गुढता सहज उलगडत नाही.

रात्र काळी घागर काळी

लक्ष्मी या कादंबरीची नायिका! स्वर्गीय सौंदर्याचं लेणं लाभलेली लावण्यवती परंतु या सौंदर्याबरोबरच शापित दुर्दैव घेऊन जगणारी ही स्त्री. शरीर जगवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा म्हणजे अन्न-वस्त्र-निवारा या जशा आवश्यक असतात तसं माणसाचं मन जिवंत राहण्यासाठी जोडीदाराचं प्रेम ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. प्रेमाचे अनंत प्रकार आहेत पण मुख्य म्हणजे दैहीक आणि ऐहिक, मानसिक आणि हृदयीक! प्रेम ही भूक आहे. जशी अन्नाची भूक भागविल्याशिवाय शरीर जगू शकत नाही तशी प्रेमाची भूक भागविल्याशिवाय मन जगू शकत नाही. मन मेले तर शरीर मरते.

**''टूटा हुआ मन अगर बिखर जाए,**
**तो रूह भी कफन ओढ़ लेती है,**
**ज़िंदा तो रहती है सांसें,**
**पर हस्ती मौत से पहले ही**
**दम तोड़ देती है।''**


प्रेमात आधी मनोमिलन होतं आणि मग देहमिलन.

प्रेमासोबत येणारी समागमाची ओढ ही नैसर्गिकतःच येते. दोन मने जुळल्यावर जेव्हा समागम होतो त्यावेळी दोन आत्मे एकरूप-एकाकार झाल्याचा भास होतो. जोपर्यंत ही



अनुभूती मिळत नाही तोपर्यंत माणूस सैरभैर असतो, बावरा होतो आणि शेवटी अतृप्तच राहतो ही या कादंबरीची मध्यवर्ती संकल्पना आहे. कादंबरी १९६३ मध्ये प्रकाशित झालेली आहे. मूळ लिहिलेली आहे 'झाडे नग्न झाली' या नावाने १९६१ मध्ये 'रहस्यरंजन' या दिवाळी अंकासाठी लघुकादंबरी स्वरूपात. सालाचा उल्लेख यासाठी की त्या काळात एकमेकांना आवडणाऱ्या स्त्री-पुरूषांनी एकत्र येऊन राहण्यासाठी 'लिव्ह इन रिलेशनशीप' हा विवाहबाह्य कायदेशीर उपचार/पर्याय उपलब्ध नव्हता. आज असला तरी राजरोसपणे असे करू धजावणारी जोडपीही अपवादानेच आढळतात. १९६३ मध्ये प्रकाशित झालेल्या या कादंबरीतून व्यक्त झालेले जीवनाचे तत्त्व आजही लागू पडते. मनुष्ययोनीत जन्माला आलेल्या प्रत्येकाला प्रेमाची तृप्ती समागमाच्या मार्गातून मिळावी ही ओढ असणं हे नैसर्गिकच आहे. आजच्या घडीलाही ते त्रिकालबाधित सत्य आहे. तेव्हाचा काळ आणि आजचा काळ यातल्या जीवनसरणीत खूप बदल झाला असला आणि आपल्या संस्कृतीत शरीरसुखासाठी विवाह ही संकल्पना दृढ झालेली असली तरी या कादंबरीत हेच दाखवलेय की जेव्हा संस्कृतीने घालून दिलेल्या विवाहबंधनात हे सुख मिळत नाही, तिचा नवरा ते सुख देण्यास असमर्थ आहे, स्वतः असमर्थ असताना सुद्धा तिच्या शीलावर संशय घेऊन तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवतो तेव्हा अतिशय संस्कारक्षम घरात वाढलेली ती ही सगळी बंधने झुगारून देऊन कशाचीही पर्वा न करता घराच्या चौकटीचा उंबरठा ओलांडून जाण्याचे धारिष्ट्य करते. त्या काळात अशा विषयाची कादंबरी प्रकाशित करणे म्हणजे एक प्रकारचे धारिष्ट्यच होते. व्यभिचाराचा एकही शब्द न उल्लेखता ह्यात लग्नबाह्य संबंध स्पष्टपणे दर्शवले आहेत. इथे नायिकेला असलेली शरीरसुखाची आसक्ती जरी प्रथमदर्शनी दिसत असली तरी तिला खरी ओढ प्रेमाची आहे. याऊलट तिच्याभोवती गुरफटलेली पात्रेही शरीरसुखासाठी लोलुपलेली आहेत आणि अतृप्तही!

असे का व्हावे? तिचा पती हा अगदीच भित्रा, कपाळकरंटा, नपुंसक निघाला आणि तिच्या संस्कारक्षम मनाचे बांध हळूहळू तुटू लागले. ती इतकी लावण्यवती की तिच्याकडे तो साधे बघूही




शकत नाही. इतकी अलौकिक सौंदर्यवती पवित्र असूच शकत नाही ह्या संशयी विचारभुंग्यानेच तो पोखरून गेला आणि त्याच्यातल्या दुबळेपणाने त्यास आणखी क्रूर आणि बिभत्स बनवले. ज्या कारणासाठी विवाह केला त्या स्पर्शसुखाची साधी झुळूकही तिला मिळू नये ही नियतीची खेळी आणि तिथूनच या नायिकेच्या न फुलताच कळीच्या कोमेजण्याची सुरुवात होते.

खरं तर तिच्या या दुर्दैवाच्या शंकेची पाल तिच्या मनात तिच्या विवाहापूर्वीच चुकचुकलेली असते. हे सुरूवातीलाच रूपकात्मकतेने दर्शविले आहे. ज्यावेळी विवाह ठरल्याचे वृत्त समजताच 'अंबेचे दर्शन घेऊन ये' ही तिच्या बाबांची आज्ञा पूर्ण करण्यासाठी ती निघते आणि अनपेक्षित असं भयभीत करणारे जे काही अनुभवते त्या प्रसंगातूनच तिच्या दुर्दैवाचा प्रारंभ दर्शवलाय. तो कमालीचा अस्वस्थ करणारा तर आहेच परंतु अनाकलनीयही आहे. तिथेच तिला आयुष्यात पुढे येणाऱ्या भरतीचा अंदाज येत नाही व ती दृढ विश्वासाने पाण्यात उतरते परंतु भरती येते आणि ती अशी तिच्या गळ्यापर्यंतच येते, ती धड न तिला घेऊन जाते न तिला जिवंत ठेवते, तिला अधमेली करून जाते. एकुण सगळेच रुपकात्मक आहे.

कुळाचे, लौकीकाचे मी क्षणी हे तोडीले धागे
बुडाले गाव ते आता, बुडाले नाव ही मागे
दिले हे दान दैवाने, करी माझ्या कशी ठेवू...

अंबेचे दर्शन घ्यायला जाताना, नदी पार करताना तिला तिथे भास होतात. मातीची घागर पाण्यावरून उपडी वाहताना दिसते, रात्र अचानक काळी होते, पायाखालून रेशमी केसांसारखं काहीतरी पाहिल्याचा भास होतो. हे सगळं विचित्र आणि चमत्कारिक असतं. तिचा विवाह ठरल्यानंतर प्रयत्न करूनही विवाहवार्तेने न तिच्या मनात सुंदर विचार येतात ना ती तिच्या होणाऱ्या पतीच्या देहाची कल्पना साकारू शकते. असे का होते याचे तिला आश्चर्यही वाटते. उलट तिला नकोनकोसे भास होतात.

खऱ्या आयुष्यातही अशी अनुभूती अनेकदा येत असते. भविष्यात येणाऱ्या संकटाची चाहूल आपल्याला कुठल्याही रूपकात्मक अनुभवातून मिळत असते पण कोरं मन हे इतकं सकारात्मक असतं की कुठलाही नकारात्मकतेचा लवलेशही नकळतच विरून जातो.

कादंबरीतली भाषा म्हणजे मराठी भाषेच्या उच्चतम दर्जेचे उत्तम उदाहरण. आजच्या काळात अशी भाषा वाचायला मिळणं दुर्मीळच.

मला भावलेली काही उदाहरणे इथे देते... ''शेलाट्या अंगाचा गोविंदा, सांध्यार होडी, साखर स्वप्नातील डोळे..., चंद्रकोरीहून शीतल अशी प्रभा... डोम कावळ्याच्या शीरेसारखं... रात्र पुरासारखी चढत गेली... व मन नीमग्न व्हावं... जाईचं कण्हणं काळोखासारखं पसरलं... आकृतीनं आकाशी वस्त्र फेडलं... डोळ्याची बुबुळ आतून ताणल्यासारखी होती... अशा अनेक उपमा-अलंकार यात आपल्याला वाचायला मिळतात. आता अशी वर्णने हल्लीच्या पिढीला कितपत भावतील याबाबत शंकाच आहे! (आजची युवा पिढी अशा भाषाप्रगल्भ मराठी वाययाची मागणी करतील का हाही प्रश्न आहेच!) खणखणीत रुद्र म्हणणारा, देहाने भरीव असणारा, वज्रदेही, रुंद पाठीचा, कुरूळ्या केसांच्या भरदार छातीचा सुस्वरूप, गौरकांतीचा, गहिरे डोळे असणारा पुरुष (दिगंबर-नायिकेचा पती) केवळ शरीराने देखणा आहे पण मनाने विद्रूप! मनाने देखणा नसलेला पुरुष एका स्त्रीचे आयुष्य कसे छीन्न विच्छीन्न करतो याचे उदाहरण म्हणजे ही कादंबरी. काही मनं इतकी करंटी असतात की स्वतःच्या भाग्यात लाभलेलं लखलखीत लावण्यही ते पचवू शकत नाहीत. या कादंबरीची (पतीकडून झीडकारलेली) नायिका स्वतःला सत्शील ठेवण्याचा विफल प्रयत्न विवाहानंतर सुरुवातीच्या काळात करते परंतु देहाच्या आसक्तीपुढे तिच्यात रुजलेले संस्कार गळून पडतात आणि ती त्या भेकड, रूक्ष, मालवलेल्या मनाच्या पतीसमोर अनेक प्रकारे वांछना करूनही तिच्या पदरी दुस्वास, झिडकारणं हेच येतं तेव्हा ती बिथरते आणि तिचं आयुष्य अवकाळी पसरलेल्या रात्रीसारखं निरंग होतं, तरी तिचा देह भूक शमलेल्या आभासी अवस्थेत राहू शकत नाही. तो सुंदर देह सुकला तरी त्याची आसक्ती कमी होत नाही आणि त्यापायी ती उंबरठा ओलांडते.

तिचे सौंदर्य म्हणजे जसं नीलकमळाचं सौंदर्य! ते आकर्षक असलं तरी त्याला कवेत घेऊ पाहणारा प्रत्येक जण केवळ दलदलीतच फसतो तसं काहीसं लक्ष्मीसोबत शेवटपर्यंत होतं.

लक्ष्मीचा भरतीतून वाचलेला देह फक्त एक नमस्कार मिळवून आणि सदूला जन्म देऊन नंतर कोरडाच राहतो...


'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# माणसं अधिक संवेदनशील करणारं पुस्तक

**संगमनेर येथील लेखक अशोक शेटे यांचे 'अनुभवाचे अंतरंग' हे पुस्तक 'चपराक प्रकाशन'तर्फे वाचकांच्या भेटीस आले आहे. सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक संदीप वाकचौरे यांनी या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेचा हा सारांश.**

शिक्षणात कार्यरत असणारी माणसं अधिक संवेदनशील असतात. सरकारच्या दृष्टीने शिक्षक होण्यासाठी शैक्षणिक-व्यावसायिक पात्रता आवश्यक आहे मात्र समाज म्हणून आणि स्वतःला शिक्षक म्हणून घडवताना, त्यापलीकडे बरेच काही हवे असते. त्यासंदर्भाने महात्मा गांधी, विनोबा भावे, गिजूभाई बधेका, योगी अरविंद, कृष्णमूर्ती यांच्यासारख्या अनेक विचारवंतांनी केलेला विचार निश्चित दिशादर्शक ठरतो. त्यामुळे माणूस म्हणून आवश्यक असलेल्या गुणांची समृद्धता असल्याशिवाय चांगले शिक्षक होता येत नाही.

शिक्षणातून अक्षराच्या साक्षरतेपलीकडे दृष्टीकोनाची पेरणी नितांत गरजेची झाली आहे. त्या दृष्टीने प्रवास केला की, त्यात जे काही सापडत जाते, ते शब्दबद्ध केले की साहित्याची वाट अधिक समृद्ध होत जाते. आजवर या दिशेने प्रवास करणाऱ्या अनेकांनी स्वतःला समृद्ध करतानाच, मराठी साहित्यात भर टाकली आहे. महाराष्ट्राची प्राथमिक शिक्षकांची परंपरा तशी मोठी आहे. वि. स. खांडेकर, साने गुरूजी, नरहर कुरुंदकर यांसारखी समाजाला दिशा देणारी माणसं याच व्यवस्थेत घडली. त्यांनी समाजाला घडवण्याचा वाटा अधिक रूंदावत नेल्याचा इतिहास आहे. शिक्षक म्हणून स्वतःला घडवतानाच, समाजालाही समृद्ध करणाऱ्या कथा, कांदबरीबरोबरच वैचारिक साहित्याची निर्मिती केली आहे. त्यातून आजवर अनेक मस्तके घडत गेली आहेत. ही समृद्ध परंपरा पुढे चालवण्याचा प्रयत्न आपापल्या परीने पुढची पिढी करत असते. प्राथमिक शिक्षक असलेले अशोक शेटे यांनी देखील शिक्षणाच्या प्रवाहात स्वतःला घडवण्याच्या दृष्टीने नवनवीन वाटांचा शोध घेणे सातत्याने सुरू ठेवले आहे. माणसांची अभिव्यक्त होण्याची वृत्ती ही नैसर्गिक असते. ही वृत्ती सर्वांची समान असली, तरी अभिव्यक्त होण्याची पद्धत मात्र प्रत्येकाची भिन्न असते. कोणी लेखनाद्वारे, कोणी भाषणाद्वारे, कोणी चित्राद्वारे यासारख्या विविध पद्धतीने अभिव्यक्त होत असतो. शेटे यांनी लेखनांद्वारे अभिव्यक्त होण्याची वाट निवडली आहे. त्यांनी निवडलेल्या या वाटेमुळे हे पुस्तक वाचकांच्या हाती पडते आहे. शिक्षण अधिक प्रयोगशील व्हावे याकरिता शेटे यांनी शिक्षणात नवनवीन वाटा चालण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या वाटांचा प्रवास या अनुभवाच्या लेखनातून वाचकांना निश्चित अंतर्मुख करून जातो. शिक्षणाविषयी समाजात व्यक्त होणारे मतप्रवाह दोन टोकाचे आहेत. या दोन टोकावर उभे राहून समाजात मते मांडली जात असताना त्या मतांच्या संदर्भाने मतांचा प्रतिवाद करणारी व्यवस्था आपल्याकडे फारशी नाही. त्यामुळे अनेक गैरसमज पुढे घेऊन व्यवस्था प्रवास करत आहेत. त्यामुळे कधीतरी कोणाच्या मनात शिक्षक हा आरोपांच्या तुरूंगात उभा केलेला असतो मात्र यासारख्या पुस्तकांनी शिक्षकांचे प्रयत्न आणि वेदनेचा हुंकार समोर आला तर त्यातून एका घटकांच्या वेदना समाजाला कळण्यास मदत होणार आहे. मुळात शिक्षणात कार्यरत असणारी माणसं खूप भोगतात, सोसतात पण त्यांच्या त्या वेदना, अनुभव शब्दबद्ध होत नाहीत. अर्थात अलीकडच्या काळात महाराष्ट्रातील काही शिक्षकांनी हा मार्ग अनुसरला आहे, त्यामुळे त्याचे स्वागत करायला हवे. त्याच वाटेने शेटे प्रवास करू पाहत आहेत. त्यामुळे हे पुस्तक शेटेंचे अनुभवांचे दर्शन घडवत असले तरी ते समाजातील एका गटाचे प्रतिनिधीत्व करते आहे हे लक्षात घ्यायला हवे.




शेटे यांचे 'अनुभवाचे अंतरंग' हे पुस्तक साहित्यातील कोणत्या प्रकारात मोडते हे कदाचित सांगणे कठीण आहे. काही लेखनाला ललित, कथा, निवेदन असे स्वरूप आहे. खरं तर ते कोणत्या प्रकारात मोडते हे महत्त्वाचे नाही. महत्त्वाची गोष्ट आहे, ते त्यांचे आंतरिक मनातील वेदनेचे निवेदन. त्यांच्या या संपूर्ण पुस्तकात अधिक निर्मळता, प्रामाणिकपणा, सामाजिक भान, समाज, विद्यार्थी यांच्याप्रति निश्चित कळवळा असल्याचे सतत जाणवत राहते. त्यांच्या कथन-लेखनात तो प्रामाणिकपणा आलेला आहे. तेच त्यांच्या लेखनाचे बलस्थान आहे. त्यामुळे लेखनातील भाषा फारशी अंलकृत नाही, सजवलेली, नटवलेली नाही. म्हणून वास्तवाचे भान कमी होताना दिसत नाही. त्याचबरोबर अनेक ठिकाणी ग्राम्य बोलीच्या शब्दांचा प्रभाव देखील अनुभवास येतो. भाषा जागतिकीकरणानंतर बदलत असताना, आपल्या बोलीचे सामर्थ्य देखील जोपासायला हवेच. त्यादृष्टीने अनेक शब्द वाचकांना वाचायला मिळतात. नव्या पिढीला त्यासाठी ज्येष्ठांशी संवाद ठेवावा लागेल. म्हणजे अर्थ उलगडण्यास मदत होईल. अर्थात त्यांच्या कथन-निवेदनावर कोणताही परिणाम होत नाही. त्याउलट अत्यंत सरळपणे मनातील भावभावनांचे निर्मळतेचे कथन अधिक मनाला भिडणारे ठरते आहे. सांगण्याचे भाव निर्मळ असतील तर भाषा हा अडथळा ठरत नाही, हे पुस्तक वाचताना सातत्याने जाणवत राहते. अनेक ठिकाणी त्यांच्या लेखनात विनोदाचा कंगोराही स्पर्शीत झालेला अनुभवास येतो. त्यामुळे वाचता वाचता कधी तरी आपल्याच चेहऱ्यावर हास्याची लकेर येतेच पण आत्मभान देखील येत जाते. त्यादृष्टीने हे लेखन अधिक महत्त्वाचे ठरते.

त्यांच्या पहिल्याच कथेत शाळेच्या विकासासाठी मदत झाली, तर काय करता येईल यासंदर्भातील विचार, त्यासाठी परदेशी असलेल्या व्यक्तिसोबतचा संवाद, मनातील भावभावनांचे दर्शन आणि मानसिक संघर्ष वाचायला मिळतो. संघर्षाची वाट चालताना संयम आणि विवेक ठेवला तर आयुष्याची वाट सुलभ होते हे अनेक कथांमध्ये दर्शित झाल्याशिवाय राहत नाही. छडीपलीकडील धडा वाचताना मुलांच्या संवादात भाषा ही किती मोठा अडथळा असतो हे लक्षात येते. भाषेशिवाय संवादच होत नाही हे अधोरेखित होते. शिक्षक आणि विद्यार्थी यांची हृदये जुळत नाहीत. सरकारी शाळांमध्ये शिक्षक अध्ययन-अध्यापन करताना किती विविध अनुभवांना सामोरे जातात याचा अनुभव जितका वाचनीय झाला, तितकेच तेथील नागरिकांचे शिक्षक व शिक्षणाविषयीच्या आस्थेचे दर्शनही घडत जाते. एकूण या पुस्तकातील सर्वच कथा म्हणजे जिवंत अनुभवांचे दर्शन घडवत जातात. त्यामुळे या अनुभवांची मांडणी समाजाच्या परिस्थितीचे होणारे दर्शन घडवत विचार करायला भाग पाडते. समाजातील समस्यांचे, वास्तवाचे दर्शन अनेक कथांमध्ये होत जाते. या कथा जणू आपल्या अवतीभोवती घडत आहेत असा जिवंत अनुभव वाचकांना अनुभवास येतो. एखादी घटना, त्यातील पात्रे ही ज्या क्षेत्रातील आणि जातीची आहेत, त्यांच्याच शब्दात आणि त्याच भाषेत वाचायला मिळत असल्याने कथांमधील जिवंतपणा वाचकांनाही अनुभवास येतो. हेच कथांचे बलस्थान आहे. शेटे यांनी विविध ठिकाणी केलेल्या कामातील अनुभव, तेथील भाषा काहीशा आत्मसात केल्या आहेत. त्यामुळे कथांमधील पात्र वाचकांच्या मनावरही अधिराज्य करत जातात.

# सहलीचा समृद्ध अनुभव


**सातारा येथील श्रीराम नानल यांच्या 'चपराक प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या 'अमेरिकेच्या अंतरंगात' या पुस्तकाचे प्रकाशन २४ एप्रिल रोजी समारंभपूर्वक होत आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ संपादक श्रीकांत कात्रे यांनी लिहिलेली ही प्रस्तावना.**

अमेरिका एक शक्तिशाली राष्ट्र. एका बाजूने समृद्ध आणि अपूर्णही! कारण झगमगाटाबरोबर येथे गरिबीही नांदते आहे. आपल्या निरीक्षणाची नोंद करायची आणि प्रवास वर्णन लिहायचे. हे प्रवास वर्णन इतरांना आनंद देईल व अनुभूतीही देईल. असा प्रयोग सर्वांनाच करता येतो असे नाही. सातारा शहरातील एक सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व श्रीराम नानल यांनी त्यांच्या खास शैलीत अमेरिकेतील विविध भागांतील विविध विषयांवर केलेले लेखन अमेरिकाच नव्हे तर कोणत्याही प्रदेशात दौरा करु इच्छिणाऱ्यांना प्रेरणा देणारे ठरेल. निसर्ग सौंदर्यापासून ज्ञान-विज्ञानाच्या विविध शाखांपर्यंत आणि अर्थकारणापासून सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांपर्यंत विविध अंगांनी अमेरिकेतील चित्र ते आपल्या मनासमोर उभे करतात. जे वाटले ते श्री. नानल प्रामाणिकपणे नोंदवतात, हे या वर्णनाचे वैशिष्ट्य आहे.



श्रीकांत कात्रे
ज्येष्ठ संपादक, सातारा
८३८००७८७७३

श्रीराम नानल बँक ऑफ महाराष्ट्रचे निवृत्त अधिकारी. साताऱ्याच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचा सहज वावर नेहमीच आश्वासक असतो. आम्ही पुस्तकप्रेमी समूहाच्या उपक्रमाने ते अनेकांशी जोडले गेले आहेत. कुणाला आवडो, नावडो विविध विषयांवर आपली मते प्रांजळपणे व प्रसंगी परखडपणे मांडत असतात.




त्या स्वभावानुसार अमेरिकेतील वास्तवाबाबत त्यांनी आपल्या लेखणीतून नेमके विश्लेषणही आवश्यक ठिकाणी केले आहे. प्रवासवर्णने आणि अमेरिकेविषयी लिहिणे हे काम अगदी विद्वानांपासून ते मान्यवरांपर्यंत अनेकांनी केले आहे पण श्रीराम नानल यांनी एका सजग नागरिकाच्या भूमिकेतून केलेले लेखन आपले वाटते. त्यांना तेथील सौंदर्याचा, शिस्तीचा, स्वच्छतेचा फक्त आनंदच घ्यायचा नाही तर तो आदर्शही सर्वांनी घेण्याचा आग्रह त्यांच्या शब्दांतून जाणवतो. अनेक स्थळांची ते फक्त माहिती देत नाहीत तर ती देताना जबाबदार पर्यटनाबाबतची जागृतीही नकळतपणे करुन जातात. हे सर्व पाहताना, निरीक्षण करताना, तिथली माहिती घेताना पदोपदी त्यांच्या मनात मातृभूमीची तळमळ जाणवते. कळत-नकळत अमेरिका आणि भारताची तुलना होते. ती स्वाभाविक असली तरीही तिच्यामागे काही निश्चित विचार आहे. मायभूच्या अभिमानाचा. तो ठायीठायी डोकावतो. हे श्रीराम नानल यांच्या लेखनाचे वेगळे स्पंदन आहे. व्हेल पाहण्याचा अनुभवही त्यांना आनंद देतो. धावताना तरंगण्याची किमया तेवढ्या उत्सुकतेने ते पाहतात. त्यांना झुलत्या पुलाचे आश्चर्य वाटते. काही ठिकाणी त्यांना शांततेचे नंदनवन अनुभवता येते, जलआरसा, जलमय अशा उपमांनी पाण्यासाठी जपलेला कटाक्ष निदर्शनास आणून देतात. तशाच पद्धतीने जंगलातील अनुभव त्यांना विलक्षण वाटतात आणि हरवलेल्या गुरुत्वाकर्षणाचे कुतूहलही ते वाढवितात. खळखळणाऱ्या लाटा सुद्धा या माणसाला सभ्य वाटतात.

अमेरिकेची आपल्या भारताशी तुलना करताना ते मातृभूमीविषयी अधिकच भावूक होतात. अमेरिकेतील शिस्त, स्वच्छता त्यांना आवडते. त्याचबरोबर भारतातील सहजीवनाचे महत्त्व ते अधोरेखित करतात. म्हणजे जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी भारतमातेविषयी त्यांना वाटणारा अभिमान त्यांच्या लेखनातून डोकावत राहणार याची प्रचितीच या लेखनातून येत राहते.

वॉल स्ट्रीट जर्नल म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेचे हृदय असे सांगून त्याचे महत्त्व त्यांना पटवून द्यायचे असते. फिअरलेस गर्ल म्हणजेच स्त्री शक्तीचे द्योतक वाटते. चार्जिंग बुलसारखी आर्थिक सत्ता ते समृद्धीची दिशा दाखवतात. टाइम्स स्क्वेअरचे वैशिष्ट्य ते सांगतात. स्वतंत्रता देवीच्या पुतळ्याचा इतिहास ते सहज उलगडतात. रोजर विल्यम्स पार्क झूच्या व्यवस्थापनाचे कौतुक करतात. मेट्रोपोलिटिन म्युझियम ऑफ आर्टमधून कलेच्या संगोपन व संवर्धनाचा आलेख मांडतात. जंगलातील जलाशयाचे मोठेपण अधोरेखित करतात. वर्ल्ड ट्रेडिंग सेंटरवर ११ सप्टेंबर रोजी झालेल्या विमान हल्ल्यातील जतन केलेल्या दृश्यांनी ते अस्वस्थ होतात. असुरक्षिततेमुळे क्षणभंगुर जीवनाची चिंताही ते व्यक्त करतात. अमेरिकेची वारी अगदी कमी कालावधीसाठी असली तरी अनेक अंगाने चिकित्सक वृत्तीने त्यांनी केलेले निरीक्षण अभ्यासपूर्ण व उत्कंठावर्धक आहे. प्रवास करणाऱ्यांना हे लेखन लिहिण्यासाठी प्रवृत्त करेल. माणसाचे जगणे कसे असावे आणि कसे नसावे याचा उलगडाही हे लेखन नकळतपणे करत जाते. समृद्ध आयुष्य जगण्यासाठी आर्थिक मजबुतीसह आपले सहावे इंद्रिय जागे करण्यासाठी श्री. श्रीराम नानल यांनी केलेला हा प्रपंच अनुकरणीय आहे. परदेशी सहलीत विविध निरीक्षणं टिपताना मनामध्ये आपल्या देशाबाबतच्या विचारांचा झरा वाहता ठेवल्याने अमेरिकेच्या या सहलीचा अनुभव आपल्यालाही समृद्ध करुन जातो. त्यामुळे हे अनुभव वाचले पाहिजेत. तिथूनच आपल्याही मनात सहलीचे स्वप्न जन्म घेईल ही या निरीक्षणाची ताकद आहे.

# अक्षय्य तृतीया पावन दिन!



नागेश शेवाळकर
९४२३१३९०७१



**आपल्या हिंदू संस्कृतीत अनेक रीती–रिवाज, परंपरा, सण–उत्सव आहेत. प्रत्येक सणाचे महत्त्व वेगळे असले तरीही मानवाच्या जीवनात आनंद पेरणारे आहेत. हिंदू धर्मात साडेतीन मुहूर्ताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते साडेतीन मुहूर्त म्हणजे गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया, दसरा हे पूर्ण मुहूर्त तर दिवाळीचा पाडवा हा अर्धा मुहूर्त! या तीन मुहूर्तावर कोणतेही कार्य करीत असताना पंचांग पाहण्याची गरज नसते. अशा या साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीया या मुहूर्ताबद्दल आपण सविस्तर जाणून घेऊया.**

पांडव वनवासात असताना त्यांना वेळेवर अन्न मिळेल अशी शाश्वती नसे. कधीकधी उपवासही घडत असे. तेव्हा भगवान कृष्णाने त्यांना एक पात्र दिले. त्या पात्रातील अन्न कधीच संपत नव्हते म्हणून त्या पात्राला 'अक्षय पात्र' असे म्हणतात. अक्षय्य याचा शब्दशः अर्थ म्हणजे कधीच क्षय होणार नाही, कधीच संपणार नाही असे. तो दिवस अक्षय्य तृतीयेचा होता म्हणून त्याला अक्षय्य तृतीया म्हणतात. 'न क्षय इति अक्षय' म्हणजे ज्याचा कधीही क्षय होत नाही, तो अक्षय होय. त्यामुळे या दिवशी जे काही शुभ कार्य, उपासना किंवा दान वगैरे केले तर ते सर्व अक्षय्य होते.

अक्षय पात्र देताना श्रीकृष्ण म्हणाले,

**अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्तं तेनाक्षयेति**
**कथिता मुनिभिस्तृतीया ।**
**उद्दिश्य दैवतपितृन्क्रियते मनुष्यैः तच्चाक्षयं भवति**
**भारत सर्वमेव ।। मदनरत्न**

युधिष्ठिरा, आजच्या दिवशी केलेले दान आणि धार्मिक कार्य क्षयाला जात नाही; म्हणून मुनींनी या तिथीला 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय होते, त्याचा नाश होत नाही.

या दिवशी केलेल्या दानातून पुष्कळ पुण्य मिळाल्यामुळे पूर्वी कळत नकळत केलेल्या पापाचा क्षय होतो. एखाद्या मानवाने पूर्वी केलेले कर्म चांगले असल्यास त्याचा पुण्यसाठा वाढतो. त्याला स्वर्गप्राप्ती होऊ शकते.

अक्षय्य तृतीयेच्या संदर्भात काही कथा/आख्यायिका प्राचीन ग्रंथांमध्ये मिळतात. त्यातील काही पुढीलप्रमाणे आहेत :–

पूर्वीच्या काळात एक व्यापारी होता. तो अत्यंत धार्मिक होता. व्यापार म्हटलं की चढउतार हे ठरलेलेच. या व्यापाऱ्यालाही मोठा आर्थिक फटका बसला. त्याचे सारे वैभव नष्ट झाले. त्यावर्षी अक्षय्य तृतीया बुधवारी होती. विशेष म्हणजे त्या दिवशी रोहिणी नक्षत्र होते. असा त्रिवेणी योगायोग आलेला दिवस अत्यंत पवित्र असतो. व्यापाऱ्याचे आचरण धर्मनिष्ठ असल्यामुळे तो या दिवसाचे महत्त्व जाणून होता. त्याप्रमाणे त्याने अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर व्रताचे सारे विधी यथासांग नि श्रद्धापूर्वक अंतःकरणाने केले. काही गोष्टींचे, विधींचे पुण्य त्या युगात न मिळता पुढील जन्मात मिळते. त्यानुसार पुढील जन्मी तो व्यापारी कुशावर्ती नगरीचा राजा झाला. त्याने त्या जन्मात स्वतःही अनंत सुख उपभोगताना जनतेलाही सुखी केले.

पौराणिक मान्यतेनुसार, अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सत्ययुग आणि त्रेतायुगाची सुरुवात झाली. याशिवाय वैशाख शुक्ल पक्षाच्या तृतीयेला परशुराम यांचा जन्म झाला. परशुराम हा श्रीविष्णुचा सहावा अवतार होता. त्या दिवशी



परशुराम जन्मोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. जयंतीही साजरी केली जाते. अक्षय्य तृतीया भारताच्या दक्षिण भागात साजरी केली जाते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशीच वृंदावन येथे असलेल्या श्री बांके बिहारीजींच्या मंदिरात श्री विग्रहाच्या चरणांचं दर्शन होतं.

देवांचे खजिनदार कुबेर यांनी शिवपुरम येथे महादेवाची पूजा केली. त्यामुळे प्रसन्न झालेल्या शंकराने कुबेराला वरदान मागायला सांगितले. कुबेराने लक्ष्मीकडून आपली संपत्ती परत मिळवण्यासाठी वर मागितला. तेव्हा शंकराने कुबेराला लक्ष्मीची पूजा करण्याचा सल्ला दिला. कुबेराने लक्ष्मीची पूजा केली. तो दिवस अक्षय्य तृतीया असल्याने तेव्हापासून अक्षय्य तृतीयेला लक्ष्मीची पूजा केली जाते. लक्ष्मी ही विष्णूची पत्नी आहे, म्हणूनच भगवान विष्णूंसह कुबेराचीही पूजा केली.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशीच महाभारताच्या सभेत दुशासनाने द्रौपदीचा अपमान केला होता. त्याने द्रौपदीचे वस्त्रहरण करण्याचा प्रयत्न केला. सभेत पांडव होते, कौरव होते, इतरही महायोद्धे होते परंतु आक्रोश करणाऱ्या द्रौपदीला वाचवण्यासाठी कुणीही पुढे आले नाही. तेव्हा श्रीकृष्णाने कधीही न संपणारी अशी एक साडी दौपदीला दान केल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

अक्षय्य तृतीया हा दिवस सुदामासाठी अत्यंत आनंददायी ठरला. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी श्रीकृष्णाचा अतिशय गरीब मित्र सुदामा कृष्णाला भेटायला गेला. कृष्णाला देण्यासाठी सुदामाकडे फक्त पोहे होते. ती भेट कृष्णाला द्यावी की नाही या विचारात सुदामा असताना श्रीकृष्णाने ती पुडी हिसकावून घेतली. ते पोहे श्रीकृष्णाने मिटक्या मारत खाल्ले. सुदामाने श्रीकृष्णाकडे कोणतीही मागणी केली नाही परंतु श्रीकृष्णाने त्याच्या हृदयातील भाव जाणले. सुदामा घरी पोहोचेपर्यंत त्याच्या मोडक्या घराचे महालात रूपांतर झाले होते. त्याला सर्व सुविधा प्राप्त झाल्या होत्या. तेव्हापासून अक्षय्य तृतीयेला दान करण्याचे महत्त्व वाढले.

धरमदास नावाचा एक गरीब गृहस्थ एका छोट्या गावात राहत होता. त्याच्या कुटुंबात भरपूर सदस्य होते. धर्मदास धार्मिक वृत्तीचा होता. कुटुंबाचा चरितार्थ नीट चालावा, खाण्यापिण्याची आबाळ होऊ नये म्हणून एकदा धरमदास यांनी अक्षय्य तृतीयेला उपवास करण्याचा विचार केला. त्याप्रमाणे धरमदास अक्षय तृतीयेच्या दिवशी सकाळी लवकर उठला. गंगेवर जाऊन आंघोळ करून घरी आला.

क्षमतेप्रमाणे भगवान विष्णूची पूजा, आरती केली. घरात असलेल्या अनेक वस्तू त्याने देवाच्या चरणी ठेवून दान केल्या. ते पाहून धर्मदासाला त्याच्या पत्नीसह कुटुंबीयांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. धरमदासाने कुणाचेही ऐकले नाही. त्याने ब्राह्मणांना सर्व काही दान केले. या दानाचे पुण्य धरमदासाला पुढील जन्मात मिळाले. तो एका राज्याचा राजा झाला.

एका उल्लेखानुसार त्रेतायुगाच्या सुरुवातीला भगीरथाने पवित्र मानली जाणारी गंगा नदी याच दिवशी स्वर्गातून पृथ्वीवर आली होती. या दिवशी पवित्र गंगा नदीत स्नान केल्याने व्यक्तिची पापे नष्ट होतात, असे मानले जाते.

अक्षय्य तृतीयेला तन, मन नि धनही अर्पण करावे. ते कसे? तनाचे अर्थात शरीराचे दान म्हणजे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होऊन आनंद मिळवावा. मनाचे दान म्हणजे यादिवशी सातत्याने धार्मिक विधी करावेत. पूजा, जप, धार्मिक ग्रंथांचे वाचन करावे. धनाचे दान म्हणजे आपल्याला योग्य वाटेल असे धन, वस्तू, पुस्तके इत्यादी गोष्टींचे दान करावे. गोष्टी छोट्या असतात परंतु त्यांचे महत्त्व अपरंपार असते.

अक्षय्य तृतीया हा दिवस आपल्या पूर्वजांना मनोमन नमस्कार करून पिंडदान करण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी अपिंडक श्राद्ध किंवा तीळ अर्पण करावेत. त्यामुळे पूर्वजांची कृपा मला कुटुंबावर राहते. या दिवशी ब्राह्मणाला उदकुंभाचे (पाण्याने भरलेले मातीचे पात्र) दान देतांना पुढील मंत्र म्हणावा...

**एष धर्मघटो दत्तो ब्रह्मविष्णुशिवात्मकः ।**
**अस्य प्रदानात्? तृप्यन्तु पितरोऽपि पितामहाः ।।**
**गन्धोदकतिलैर्मिश्रं सान्नं कुम्भं फलान्वितम्? ।**
**पितृभ्यः सम्प्रदास्यामि अक्षय्यमुपतिष्ठतु ।।**

(ब्रह्मा, विष्णू आणि शिव सामावले आहेत असा हा धर्मघट मी ब्राह्मणाला दान करीत आहे. अशा दानामुळे माझे पित्र आणि देवता तृप्त होवोत. गंध, उदक, तीळ, फळांसह युक्त असा हा कुंभ मी माझ्या पितरांना अर्पण करीत आहे. हा कुंभ माझ्या माझ्यासाठी सतत अक्षय ठरावा.)

अनेक ठिकाणी असेही वाचण्यात आले की, अक्षय्य तृतीयेचा हा दिवस माफीचा दिवस म्हणून मानला जातो. या दिवशी जर एखाद्या व्यक्तिने स्वतःच्या किंवा आपल्या कुटुंबीयांकडून नकळत झालेल्या चुकांबद्दल क्षमा मागितली तर त्याच्या सर्व चुकांना क्षमा मिळते, त्याला देवांचा आशीर्वाद मिळतो. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा (देवी) जयंती, नर–नारायण जयंती, परशुराम जयंती, बसवेश्वर जयंती आणि हयग्रीव जयंती साजरी केली जाते. अशा रीतीने अक्षय्य तृतीया हा दिवस सर्वच तीर्थ दृष्टीने अत्यंत पवित्र आहे. या दिवशी केलेले दान, केलेली कामे आशीर्वाद मिळवून देतात. आपणही एक संकल्प करूया... दानाचा! पुस्तकं दान करणे हेही एक पवित्र दानच आहे. तेव्हा सुरुवात तर करुया...



# सह्याद्रीच्या कुशीतलं बालपण



मंगेश मुरलीधर दौंडकर
९८९०६१९३५४

**बालपण - प्रत्येकाच्या आयुष्यातील एक सुंदर, निरागस आणि आनंदानं भरलेलं पर्व. आपण कितीही मोठे झालो तरी बालपण आठवलं की मन एखाद्या पक्ष्यासारखं त्या काळात भुर्रकन उडून जातं. तो एक काळ होता, जेव्हा आयुष्य अगदी सोपं आणि सुंदर वाटायचं. भविष्याची चिंता नव्हती की अपेक्षांचं ओझं नव्हतं. छोट्या छोट्या गोष्टींत देखील आनंद मिळायचा. रुसवा फुगवा दूर करायला दोन बोटांची जुळणी पुरेशी असायची. वाढत्या जबाबदाऱ्या, कामाचा ताण आणि शहराच्या गर्दीत ते बालपण कधी हरवलं, कुठे हरवलं कळलंच नाही.**



जेव्हा माझ्या मुलाच्या डोळ्यांत मी स्वतःला पाहू लागलो - त्याचे प्रश्न, त्याची उत्सुकता आणि आयुष्याकडे बघण्याचा निरागस दृष्टिकोन तेव्हा जाणवलं की बालपण अजून जिवंत आहे. ते हरवलं नाही, फक्त झाकलं गेलंय! जबाबदारीच्या धुळीत, काळाच्या धुक्यात. मग एक गोष्ट मनाशी पक्की केली, आपण दोघांनी मिळून हरवलेलं बालपण पुन्हा शोधायचं! आणि त्यातून सुरु झाली आमची आडवाटांवरच्या दुर्गपंढरीची वारी! पवनमावळातल्या एका छोट्याश्या किल्ल्यापासून सुरु झालेला आमचा हा प्रवास सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील अनोखी क्षितिजं पार करतोय.

सह्याद्री म्हणजे केवळ पर्वतरांग नाही. ती आहे एक शिदोरी - निसर्गाची, संस्कृतीची आणि इतिहासाचीही. मला अजूनही आठवतंय, लहानपणी वडिलांसोबत केलेली सह्याद्रीच्या रानवाटांची भटकंती - भिजलेल्या मातीचा गंध, वाऱ्यावर डोलणारी गवताची पाती, पानांआडून डोकावणारी फुलं, ओहोळाचं संगीत आणि पक्ष्यांची कुजबुज. शाळा सुटल्याची घंटा झाली की रान मोकळं असायचं. कधी एखादा डोंगर तर कधी नदीचा काठ. त्यावेळचं सगळं आज धूसर होत चाललंय; पण आता मी ठरवलंय, आपल्या मुलालाही हीच भेट द्यायची आणि त्याचवेळी आपलं हरवलेलं बालपण पुन्हा अनुभवायचं.

निसर्गासारखी सुंदर, मनाला भिडणारी आणि अनुभवाने शिकवणारी दुसरी शाळा असूच शकत नाही. प्रत्येक सुट्टीचा दिवस हा आपल्या मुलासाठी एक नवीन अनुभव, एक नवीन शिकवण घेऊन यावा अशी माझी इच्छा असते. सुट्टीचा दिवस उजाडला की डोंगरदऱ्यांच्या कुशीत, वनराईच्या सहवासात, पक्षांच्या किलबिलाटात आणि निर्झराच्या आल्हाददायक वातावरणात आमची शाळा भरते. जिथे पाठीवर दप्तराचं ओझं नसतं, छडीचा मार नसतो, कुणाशी स्पर्धा नसते की परीक्षेची भीती नसते. असतो तो स्वच्छंद विहार. इथे झाडांची पानं पुस्तक बनतात, वाऱ्याचा आवाज धडे शिकवतो आणि झऱ्याचं पाणी गाणी गातं. इथला प्रत्येक घटक वाटेवरचं धुकं, मातीचा गंध, वाऱ्याचा स्पर्श आपल्या कृतीतून काही ना काही शिकवण देत असतो.

माझा मुलगा वयाने जरी लहान असला तरी वाटेत दिसणारी प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याचं त्याचं कुतूहल आणि चौकसपणा आम्हाला बऱ्याचदा निरुत्तर करून सोडतो. ''वाट कशी तयार होते?'', ''झाडं आपापसात बोलतात का?'', ''धबधब्याचं पाणी नेमकं येतं कुठून?'' त्याच्या या प्रश्नांची उत्तरं कुठल्या पाठ्यपुस्तकातही लिहिलेली नसतात. सांगण्याचं तात्पर्य मुलांना असे प्रश्न हे पडायलाच हवेत. शिक्षण हे मुक्त असावं, बंदिस्त नसावं. ते निसर्गाशी जोडलेलं असावं.

एखाद्या गोष्टीला जाणून घेण्याची त्याची ओढ, रानवाटांवरील जिवंत क्षणांना अनुभवण्याची तरल सौंदर्यदृष्टी, निसर्गाच्या लयीत एकरूप होऊन संवाद साधणारी कोवळ्या मनाची स्पंदने आणि हे सगळं अनुभवल्यानंतर त्या बालमनावर उमटणारं हसू, हा माझ्या आयुष्यातील एक सुवर्णक्षण असतो. त्याच्यासोबत रानवाटांची पायपीट करता करता मला हळूहळू हे जाणवू लागतं की मी त्याच्या नव्हे, माझ्याच बालपणात परत चाललो आहे. त्याचं बाबा, बाबा ऐकता ऐकता मला माझा लहानपणीचा बाबा आठवू लागतो आणि आपली मातीशी जोडलेली नाळ अधिकच घट्ट झाल्याची अनुभूती मिळते.

दिवस सरले, माणसं शहराकडे वळली आणि एकेकाळी गावाकडे मोकळ्या रानात हुंदडणारं रम्य बालपण आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कैद झालं; परंतु आजही आम्ही सह्याद्रीच्या त्या वाटेने जातो तेव्हा जाणवतं आपण जरी बदललो तरी निसर्गाची आपल्यावरची छाया तशीच आहे. दिवस बदलले, पिढ्या बदलल्या... पण, निसर्गाशी नातं अजूनही तसंच आहे.

---

# इच्छामरण

## प्रतिक्रिया



अरूण कमळापूरकर
७९७२५७३८९४

ॲडव्होकेट स्वप्नील श्रोत्री यांचा साप्ताहिक 'चपराक'मधील इच्छामरण या विषयावरील लेख वाचून मनाला काही विचार स्पर्शून गेले. मुळात या प्रकरणाला इच्छामरण संबोधणे चुकीचे आहे. हे खरं तर 'दयामरण' आहे कारण इच्छा व्यक्त करण्याच्या स्थितीत हरीश राणा नव्हताच. अरुणा शानभागच्या केसमध्ये असा निर्णय योग्य वेळी घेतला गेला असता तर तब्बल ४२ वर्षे तिला विकलांग अवस्थेत बेडवर खिळून राहावे लागले नसते. असो! उशीरा का होईना इच्छामरणाच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले हेही नसे थोडके.

अर्थात न्यायालयीन निर्णय आता आला असला तरी अशा न परतीच्या वाटेवर असलेल्या रुग्णांच्या संदर्भात कुटुंबीयांच्या संमतीने जीवरक्षक प्रणाली काढून घेऊन रुग्णाला मुक्ती देण्याचे प्रकार घडत असतातच. आपल्या सर्वांना अशा केसेस माहीत असतीलच. त्यामुळे या निर्णयाने खूप काही क्रांतिकारक घडले आहे असे अजिबात वाटत नाही. फार तर एका केसला कायद्याचे पाठबळ मिळाले इतकेच म्हणता येईल. इच्छामरण हा शब्द मी प्रथम ऐकला तो १९८० साली. पुण्यात पुरुषोत्तम मंडलिक नावाचे एक गृहस्थ राहत होते. त्यांनी ८० साली राष्ट्रपतींना पत्र लिहून आपल्याला इच्छामरण देण्याची विनंती केली होती. मंडलिक यांच्या पत्राचा गोषवारा काहीसा पुढीलप्रमाणे होता.

''मी निवृत्त शासकीय अधिकारी असून गेली वीस वर्षे निवृत्ती वेतन घेत आहे. मला संतान नाही. पत्नी सुद्धा निवर्तली आहे. मनासारखे आयुष्य जगून झाले आहे. गेली वीस वर्षे निवृत्तीचे फायदे घेत आहे. आणखी किती वर्षे समाजावर भार टाकायचा? सन्मानाने मृत्यू यावा ही इच्छा आहे. आत्महत्या करणे मला मंजूर नाही म्हणून आपण मला इच्छामरणाची परवानगी द्यावी!''

मंडलिकांच्या या पत्राला अर्थातच नकारार्थी उत्तर मिळाले कारण कुठल्याही कायद्यात अशी तरतूद नव्हती. यानंतर पुढील प्रत्येक वाढदिवसाला ते असे पत्र राष्ट्रपतींना लिहीत असत. 'मंडलिकांचे पत्र' हा वृत्तपत्रातील बातमीचा विषय होत असे. अशी चार पाच वर्षे गेल्यावर नाईलाजाने त्यांनी आत्महत्या केली. ही घटना आता परत आठवल्यावर खरेच असे वाटते की जगण्याचा अधिकार आणि सन्मानाने मृत्युचा अधिकार या एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत. पण तरीही इच्छामरण या विषयावर फारसे सकारात्मक बोलले जात नाही कारण मृत्यू हा विषय आपण काहीतरी गूढ असा समजतो. वस्तुतः जन्म जितका स्वाभाविक आहे तितकाच मृत्युपण. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या शब्दातच म्हणायचं झालं तर शरीर ज्याचे त्यासी अर्पियले इतकी ती स्वाभाविक घटक आहे. मानवी जीवन हे अगदी अमूल्य आहे आणि कोणत्याही परिस्थितीत मनुष्य जगलाच पाहिजे अशी आपली ठाम समजूत असते. खरंतर आपल्या पाहण्यात कितीतरी विकलांग, जराजर्जर आणि असाध्य रोगानं पीडित असलेले लोक येतात. यापैकी अनेक जण मृत्युचा धावा करताना दिसतात. अशांना त्यांच्या इच्छेनुसार सन्मानाने जीवन संपवण्याचा अधिकार का मिळू नये?

दुसरा एक वर्ग आहे तो एकाकी आयुष्य कंठणाऱ्या वृद्धांचा. जीवनाचा सहचर सोडून गेला/गेली आहे अशांचा. यापैकी ज्यांना अपत्य असेल त्यांचे जीवन जरा सुसह्य असते पण मुले नसतील अथवा असूनही परदेशी असतील तर हे एकाकीपण खायला उठत असणार. अशांचे भकास चेहरे मी काही वृद्धाश्रमात पाहिले आहेत. मृत्युची वाट पाहणे हाच एककलमी कार्यक्रम तिथे वाटत असावा असे वाटले. यापैकी कुणाला अंथरुणावर खिळून यातनामय अंत होण्यापूर्वी स्वेच्छेने जीवन संपवावे असे वाटत असेल तर तो अधिकार अवश्य मिळायला हवा.

आणखी एक वर्ग असू शकतो तो वर उल्लेखलेल्या मंडलिक यांच्यासारख्या मंडळींचा. शारीरिक आणि मानसिक आरोग्य अगदी ठणठणीत असूनही आता समाधानी, तृप्त आयुष्य जगून झालंय तर सन्मानाने देहत्याग करावा, उगाच 'संध्याछाया भिवविती हृदया' अशी वेळ येईपर्यंत का थांबायचे? असं वाटणारा अत्यल्पसंख्य वर्ग.

कारण कोणतेही असो, सन्मानाने जगण्याच्या अधिकारात सन्मानाने मरण्याचा अधिकार समाविष्ट व्हावा ही बदलत्या काळाची गरज आहे. त्यासाठी योग्य त्या कायदेशीर तरतुदी निर्माण केल्या जाव्यात इतकेच.

# हुंडा प्रथा

पुण्याजवळच्या वेगाने वाढणाऱ्या उपनगरात नेहा आणि तिचं कुटुंब राहत होतं. उंच इमारती, आयटी कंपन्यांची ऑफिसेस, मॉल्स, कॅफे सगळं आधुनिक होतं; पण या आधुनिकतेच्या आड काही जुन्या सावल्या अजूनही जगत होत्या. नेहा एका मल्टिनॅशनल कंपनीत नोकरी करत होती. स्वतःच्या मेहनतीवर तिने शिक्षण पूर्ण केलं होतं. तिचे वडील अनिल बँकेतून निवृत्त झाले होते आणि आई मीनल गृहिणी होती. घरात अभिमानाचं वातावरण होतं कारण मुलगी स्वतःच्या पायावर उभी होती.

एक दिवस नेहाच्या लग्नाची चर्चा सुरू झाली. नातेवाईकांनी एका मुलाची माहिती दिली. आकाश, तोही आयटी क्षेत्रात नोकरी करत होता. चांगला पगार, चांगलं कुटुंब आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे 'सुयोग्य' मुलगा. पहिली भेट एका कॅफेमध्ये झाली. दोघेही करिअर, स्वप्नं, प्रवास, आयुष्याबद्दल बोलले. नेहाला वाटलं हा मुलगा समजूतदार आहे. आकाशही तिच्या



मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा

आत्मविश्वासाने प्रभावित झाला. काही दिवसांनी दोन्ही कुटुंबांची औपचारिक भेट झाली. सुरुवातीला वातावरण छान होतं. चहा, गप्पा, हशा सगळं अगदी स्वाभाविक! पण थोड्याच वेळात आकाशचे वडील शांतपणे म्हणाले, ''आमचे काही मागणं नाहीये. फक्त आजकाल लग्नात मुलीच्या घरून काही 'सेटअप' दिलं तर पुढचं आयुष्य सोपं होतं.''

नेहाच्या आईने विचारलं, ''म्हणजे?''

''फ्लॅटसाठी डाउनपेमेंट आणि एक कार दिलीत तर मुलांचं आयुष्य नीट सुरू होईल.''

हे शब्द इतके सहजपणे बोलले गेले की जणू काही ते नैसर्गिकच होतं. कोणीही 'हुंडा' हा शब्द वापरला नव्हता पण त्याचा अर्थ सगळ्यांना समजला. त्या रात्री नेहाच्या घरात शांतता होती. आई-वडिलांच्या चेहऱ्यावर चिंता होती. ''आजकाल असंच असतं,'' एका नातेवाईकाने फोनवर सांगितलं. ''हुंडा नाही म्हणत पण 'गिफ्ट्स' म्हणतात!''

वडिलांनी शांतपणे विचारलं, ''आपण करू शकतो का?''

आईने उत्तर दिलं, ''नाही!'' कारण दोघांनाही माहीत होतं फ्लॅटसाठी पैसे म्हणजे आयुष्यभराची बचत संपवणं. नेहाने सगळं ऐकलं. ती काही वेळ शांत राहिली.

''बाबा, तुम्ही माझं शिक्षण कर्ज काढून केलं होतं ना?'' तिने विचारलं.

''हो.''

''मग आता माझ्या लग्नासाठी पुन्हा कर्ज का?''




कोणी उत्तर दिलं नाही. दुसऱ्या दिवशी नेहाने आकाशला भेटायचं ठरवलं. ''तुला माहीत आहे का, तुझ्या घरी काय बोललं गेलं?'' तिने विचारलं. आकाश थोडा अस्वस्थ झाला. ''हो! पण तो हुंडा नाहीये. फक्त सुरुवातीची मदत आहे.''

नेहा शांतपणे म्हणाली, ''मदत कोणाला? तुला की तुमच्या प्रतिष्ठेला?''

आकाशकडे उत्तर नव्हतं. ती पुढे म्हणाली, ''आजकाल हुंडा 'डिमांड' म्हणून येत नाही. तो 'अपेक्षा' म्हणून येतो.''

काही दिवस गेले. कुटुंबांमध्ये तणाव वाढला. नातेवाईकांचे सल्ले येऊ लागले. इतका चांगला मुलगा पुन्हा मिळणार नाही. थोडं देण्यात काय जातं? तुमची मुलगी तर कमावते ना! पण नेहाच्या मनात एकच प्रश्न होता जर मी कमावते तर माझ्या लग्नासाठी माझ्या घराने पैसे का द्यावेत? एक दिवस तिने आई-वडिलांसमोर स्पष्ट सांगितलं, ''माझं लग्न जर व्यवहारावर उभं राहणार असेल, तर मला ते नको.''

आईच्या डोळ्यात पाणी आलं. ''समाज काय म्हणेल?'' तिने विचारलं.

नेहा हसली. ''आई, समाज आपलं आयुष्य जगत नाही.''

काही दिवसांनी आकाशचा फोन आला. त्याने सांगितलं की त्याने घरी विरोध केला आहे. 'मी लग्न करणार असेल तर कोणत्याही अटींशिवाय,' तो म्हणाला पण त्याच्या घरच्यांना ते मान्य नव्हतं. त्यांनी स्पष्ट सांगितलं, ''ही परंपरा आहे'' आणि लग्न मोडलं. घरात शांतता पसरली! पण यावेळी ती भीतीची नव्हती; ती स्वाभिमानाची होती. काही महिन्यांनी नेहाने तिच्या कंपनीतल्या सहकाऱ्यांसोबत **"No Dowry"** या विषयावर एक छोटा उपक्रम सुरू केला. तिने सोशल मीडियावर लिहिलं, ''हुंडा आज थेट मागितला जात नाही. तो गिफ्ट्स, सेटअप, स्टेटस या नावाने येतो पण नाव बदललं म्हणून अन्याय बदलत नाही.''

त्या पोस्टला हजारो लोकांनी प्रतिसाद दिला. काहींनी स्वतःच्या कथा सांगितल्या. काहींनी लग्नात हुंडा न घेण्याचा निर्णय जाहीर केला. नेहाचे वडील एके दिवशी म्हणाले, ''आपण लग्न मोडलं पण काहीतरी जिंकलो.''

नेहा हसली. आज समाज बदलतोय असं आपण म्हणतो. मुली शिकतात, नोकरी करतात, स्वप्नं पाहतात! पण लग्नाच्या वेळी अजूनही त्यांची किंमत ठरवली जाते. फक्त शब्द बदलले आहेत. हुंडा आता उघडपणे मागितला जात नाही. तो 'स्टेटस' म्हणून येतो. 'सपोर्ट' म्हणून येतो. 'सेटअप' म्हणून येतो! पण सत्य एकच आहे, जोपर्यंत लग्नाला व्यवहाराची छटा आहे, तोपर्यंत आधुनिक समाजही पूर्णपणे मुक्त नाही. नेहाची कथा संपली नाही; कारण आजच्या समाजात अशा अनेक नेहा अजूनही उभ्या आहेत ज्या किंमत नाही, सन्मान मागतात!!

# दोन रुपयांचा धडा



भरत विठ्ठल पाटील
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा

सकाळची शाळा असल्याने फ्रेश मूडमध्ये भाषेचा पाठ शिकवत होतो. नीरव शांतता होती. वर्गातील सगळे विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकत होते; पण दुर्वाच्या चेहऱ्यावर काही तरी वेगळंच दिसत होतं. तिचा चेहरा उतरलेला, मन कुठेतरी हरवल्यासारखं वाटत होतं. मी तिला हळूच विचारलं, ''दुर्वा, काय झालं गं? तब्येत बरी नाही का?''

ती थोडा वेळ गप्प राहिली. मग हळू आवाजात म्हणाली, ''सर आज मी दुकानातून खोडरबर घेतलं ते ३ रुपयांचं होतं पण दुकानदाराने ५ रुपये घेतले।''

मी शांतपणे विचारलं, ''तू त्यांना विचारलं नाहीस का?''

ती मला खोडरबरची किंमत दाखवत म्हणाली, ''विचारलं सर पण ते म्हणाले, 'तीच किंमत आहे.' नंतर मी परत करायला गेले; पण त्यांनी ना पैसे परत दिले, ना खोडरबर घेतलं.''

हे सांगताना तिच्या डोळ्यांत पाणी तरळलं होतं. तिच्या चेहऱ्यावर गोंधळ, राग आणि थोडी भीतीही स्पष्ट दिसत होती. ती पुढे म्हणाली, ''मला खूप वाईट वाटलं सर. मला फसवल्यासारखं वाटतंय.''

मी तिच्या जवळ जाऊन प्रेमाने म्हणालो, ''असं कधी कधी होतं; पण तू चुकीची नाहीस. तू धाडस करून विचारायला गेलीस, हे खूप मोठं आहे।''

ती शांतपणे ऐकत होती. मग मी तिला समजावलं, ''पुढच्या वेळी काही घ्यायचं असेल तर आधीच किंमत विचार आणि जिथे प्रामाणिकपणा नाही, अशा दुकानात पुन्हा जाऊ नकोस।''

ती हलकंसं हसली आणि म्हणाली, ''हो सर, आता मी काळजी घेईन.''

मला त्या क्षणी जाणवलं की, ही छोटीशी घटना दुर्वासाठी फक्त पैशांची नव्हतीच; तिच्यासाठी विश्वास, आत्मसन्मान आणि स्वतःवर असलेला आत्मविश्वास यांचा प्रश्न होता. तिच्या डोळ्यांतून आलेल्या भावनांनी जाणवलं की, मुलांसाठी छोटीशी गोष्टही मोठा धडा असू शकतो.

मुलांसाठी दोन रुपयांची गोष्टही खूप मोठी असते. ती फक्त पैशांची नसते, तर विश्वासाची असते. दुर्वासाठी हा प्रसंग एक छोटासा धक्का होता; पण त्यातून तिला प्रामाणिकपणा, धाडस आणि जागरूकता यांचा महत्त्वाचा धडा मिळाला.

शाळा म्हणजे अशा छोट्या प्रसंगांतून मोठं शिकवण्याची जागा. शिक्षक म्हणून आपली भूमिका फक्त पाठ शिकवण्यापुरती मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या मनातील भावना समजून घेऊन त्यांना योग्य मार्ग दाखवण्याची आहे. प्रत्येक अनुभवातून काही शिकायला मिळतं. फसवणूक, चुकीचे वागणे किंवा गैरसमज ही आपल्याला योग्य निर्णय घेण्याचा आणि स्वतःच्या हक्कासाठी उभं राहण्याचा संधी देतात.

या प्रसंगानंतर मी संपूर्ण वर्गाशी थोडी चर्चा केली. मी मुलांना विचारलं, ''आपल्याला या प्रसंगातून काय शिकायला मिळालं?''

काही मुलं म्हणाली, ''खरेदी करताना आधीच किंमत विचारायला हवी, नाही तर वस्तूवर किंमत पाहावी.''

काहींनी सांगितलं, ''चूक झाली तर घाबरून न जाता परत जाऊन विचारायला हवं.''

मी त्यांना समजावलं, ''बरोबर आहे. आपण नेहमी जागरूक राहायला हवं. कोणतीही वस्तू घेताना तिची योग्य किंमत विचारणं, बिल घेणं आणि शंका असल्यास मोठ्यांची मदत घेणं खूप महत्त्वाचं आहे. फसवणूक झाली तर गप्प बसायचं नाही तर धाडसाने योग्य प्रश्न विचारायचे; पण त्याच वेळी संयम आणि नम्रता राखणंही तितकंच गरजेचं आहे.''


अशा प्रसंगातून मुलांना समजावायला हवं की, जीवनात प्रत्येक अनुभव आपल्याला शहाणं बनवतो. चूक झाली तरी धाडसाने निर्णय घेणं, संयम राखणं आणि प्रामाणिक राहणं ही खरी शिकवण आहे.

मुलांशी बोलताना पुढे म्हणालो, ''हे छोटे-छोटे अनुभवच तुम्हाला भविष्यात शहाणं बनवतील. योग्य निर्णय घेणं, स्वतःच्या हक्कासाठी उभं राहणं आणि प्रामाणिकपणाची कदर करणं हेच खरे जीवनातील धडे आहेत.''

मुलांनीही मान डोलावत हे मनापासून स्वीकारलं. त्या क्षणी वर्गात केवळ एक प्रसंग नव्हे तर जीवनाची एक महत्त्वाची शिकवण रुजत होती.

दोन रुपयांची ती छोटीशी घटना दुर्वासाठी जरी वेदनादायक होती तरी संपूर्ण वर्गासाठी ती जागरूकतेची आणि धाडसाची शिकवण ठरली. एक मात्र खरं आहे की, शाळा फक्त पुस्तकं शिकवत नाही तर आयुष्य जगायला शिकवते आणि म्हणूनच ती प्रत्येकाच्या मनात घर करून राहते.









संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०




ओशोंच्या कथा

**आपल्याकडे देव, धर्म, अध्यात्म याविषयी खूपच अंधानुकरण केले जाते. अनेकदा एखादी गोष्ट करताना आपण ती का करायची हा विचार करत नाही. परंपरेने आली आहे आणि आपले पूर्वज ती गोष्ट करत होते, त्यामुळे आपण ती केली पाहिजे असा हट्ट असतो! पण आपल्या पूर्वजांनी ते करताना त्यामागे नेमके कारण काय बरे असावे असा प्रश्न पडत नाही. मार्क्स म्हणाले होते की, धर्म ही अफूची गोळी आहे. धर्मामुळे माणसांच्या मनात श्रद्धा निर्माण होण्यास हरकत नाही; मात्र त्यातून अंधश्रद्धा निर्माण झाली आणि विवेक गमावणे झाले तर धर्मामुळे जीवनात जे परिवर्तन घडायला हवे असते, ते घडत नाही.**

धर्म हा माणसांचा जीवन उन्नती आणि आनंद निर्माण करण्यासाठी आहे. धर्मामुळे मानवी जीवनात शांतता निर्माण होण्याची गरज आहे. धर्माचा हेतूच समाजाला एकसंघ ठेवणे आणि समाजाचा विकास घडवून आणणे हा आहे. असे असताना जगात जितकी म्हणून युद्धे झाली त्यातील सर्वाधिक युद्धे केवळ धर्माच्या नावाखालीच झाली. धर्मामुळे युद्ध होऊन माणसं मारली जात असतील, समाज अशांत होत असेल तर धर्म चुकीचा आहे. किंबहुना धर्माचा जो विचार मनात धरला आहे तो चुकीचा आहे. त्यामुळे धर्म स्वीकारताना विवेकाचा विचार असायला हवा. धर्माचा विचार स्वीकारताना चिकित्सा व्हायला हवी. बुद्ध म्हणाले होते की, ''मी सांगतो आहे म्हणून विचार स्वीकारू नका तर तुम्ही त्या संदर्भाने विचार करा. विचारानंतर पटले तर त्या वाटेने चला!'' पण आपल्या मनात धर्माच्या परंपरेची भीती आहे. त्या भीतीने आपल्या जीवनात अधर्म निर्माण केला आहे. खरा धर्म समजून न घेता आपण धर्माच्या परंपरा डोळे बंद करून स्वीकारतो आहोत. त्यामुळे काही लोक स्वहिताच्या अनुषंगाने जे सांगतात तेच स्वीकारले जाते.

या संदर्भात ओशोंनी एक सुंदर गोष्ट सांगितली आहे. ते म्हणतात की, एक छोटेसे गाव होते. त्या गावातील लोक खूप भोळेभाबडे होते. त्यांना जे कोणी येऊन सांगायचे तसेच ते ऐकत आणि तसेच करत असत. त्यांच्या गावाच्या बाहेर एक देवाची मूर्ती होती. बिचारे सारे गाव काबाडकष्ट करत असे आणि आपला उदरनिर्वाह करत असे. कष्ट करणे आणि शक्य होईल तशी पूजाअर्चा करणे सुरू होते. तो देव तर उघड्यावर होता. त्या मूर्तीवर छत नव्हते कारण गावातील लोकांची घरे सुद्धा गरिबांसारखीच होती. एक दिवस त्यांच्या गावात एक महात्मा आले. त्यांनी गावातील देवाची मूर्ती पाहिली आणि म्हणाले, ''अनर्थ! अनर्थ!'' तेव्हा गावातील काही लोक तेथे होते. त्यांनी ते ऐकले आणि चिंताक्रांत झाले.

मग त्या गावकऱ्यांनी सर्वच ग्रामस्थांना बोलावले. ते म्हणाले, ''अरे गावकऱ्यांनो, तुम्ही सारे सावलीत राहता आणि देवाला मात्र उन्हात ठेवता. देवाच्या मस्तकावर सावली करा. देव तुमच्यावर खूप रागावला आहे, ते तुम्हाला माहीत नाही.''

गावचे लोक खूपच गरीब होते. अनेकांनी आपल्या घरांची छप्परं सुद्धा अगदी लहान केली होती. आता हे महात्मा सांगत आहेत की, देव रागावले आहेत तर आपण छत उभारले पाहिजे. मग न राहवून त्यांनी परिस्थिती नसताना देखील देवळावर शिखर उभारले. शिखर उभारल्यानंतर महात्मा दुसऱ्या गावी निघून गेले. त्यांना काय एकच गाव नव्हते, अनेक गावे होती. अनेक देव होते. साऱ्या मंदिरांवर शिखर चढविण्याची जबाबदारी त्यांचीच होती. आता देवाचा राग गेला असे त्यांना वाटले आणि आपली कामे पुन्हा सुरू झाली.

मग पुन्हा काही दिवस गेले. थोड्या दिवसानंतर गावात दुसरा एक महात्मा अवतरला. देवळाचे शिखर पाहून तो दुःखी झाला. गावकऱ्यांना एकत्र जमवून त्याने आपली नाराजी बोलून दाखविली. म्हणाला, ''सीताराम, सीताराम! अनर्थ झाला. देवळावर शिखर बांधले! अरे ईश्वराला काय तुमच्या या शिखराची आवश्यकता आहे का? कुठे आग लागली तर सगळं स्वाहा होऊन जाईल. देव जळून जाईल. आत्ताच्या आत्ता शिखर उतरवून फेकून द्या!''

गावकरी वैतागले पण ते करणार तरी काय? महात्मा तर खरंच सांगत होता कारण तो महात्मा होता. त्यांच्यावर त्यांची श्रद्धा होती. महात्म्यांच्या आज्ञेचे उल्लंघन केले तर जन्मजन्मांतरीचे पाप आपल्या मस्तकी लागेल. त्याने शाप दिला तर त्यांचे शाप आपल्याला भोगावे लागतील. आपल्याला नरकवास घडेल. लोकांनी या महात्म्याने सांगितले तसे केले.

अरे देव तर या महात्म्यांच्याच हातातले बाहुले बनतो आहे. महात्मे त्यांना हवे तसे देवाच्या नावाने करून घेतात. बिचाऱ्या गावकऱ्यांनी मुकाट्याने मंदिराचे शिखर उतरवले. कित्येक दिवसांचे श्रम, शक्ती आणि गरिबांचा पैसा असा वाया गेला. अर्थात पैसा गेला तरी त्यांना त्याचे काही वाटले नाही कारण आपली किमान होणाऱ्या पापापासून मुक्तता तरी झाली ही त्यांची धारणा झाली. निदान मंदिराचे शिखर चढवण्याच्या पापापासून गावकरी मुक्त झाले हे काय कमी आहे का? शिखर उतरविल्यानंतर महात्मा दुसऱ्या गावी चालते झाले. त्यांना काय हे एकच गाव थोडेच असते? अनेक गावे होती. अनेक देवे होते! या देवदेवतांना मंदिराच्या शिखरापासून मुक्त करण्याची जबाबदारी या महात्म्यांवरच पडलेली होती!

काही दिवस निघून गेले. अवघी लोटल्यानंतरच एक तिसरे महात्मा गावात आले परंतु यावेळी गावकरी मंडळी बरीच सावध झाली होती. ती चुकूनसुद्धा देवाच्या मूर्तीकडे फिरकली नाही. महात्मा आला तरी त्यांच्याकडे देखील दुर्लक्ष केले कारण त्याला भेटलो आणि त्यांनी पुन्हा तिसरीच काही भानगड निर्माण केली तर? त्यामुळे गावकऱ्यांनी मंदिराच्या रस्त्यावर जाणे-येणेच सोडून दिले होते. खरे तर त्या गावात जे घडले तेच जवळजवळ साऱ्या जगात घडते आहे. धर्माच्या नावाखाली या महात्म्यांनी अशा अनेक अयोग्य गोष्टी करायला लावल्या आहेत. लोकमानसात भीतीचे असे गंड निर्माण केले आहेत. लोकांनी देवाच्या, मंदिराच्या मार्गाकडे जाणे सोडून दिले, उद्या सर्वत्र असे घडले तर त्यात काही आश्चर्य नाही.

धर्माची होणारी उपेक्षा ही तथाकथित महात्म्यांनी देवाबद्दल निर्माण केलेल्या अंधविश्वासाचा परिणाम आहे. धर्माची उपेक्षा, धर्माच्या नावाखाली चाललेले सोंग-ढोंग, शोषण आणि जडता या सर्वांबद्दलची उपेक्षा आहे. धर्माची उपेक्षा, धर्माचे खोटेपणास पूरक बनणारे संप्रदाय आणि त्यापासून पसरलेला तिरस्कार, हेवेदावे, शत्रुत्व याबद्दलची उपेक्षा आहे. धर्माची उपेक्षा, धर्माची उपेक्षा नसून, वास्तविक त्या घुसडलेल्या असत्याची उपेक्षा आहे. खोट्या धर्माची उपेक्षा आहे. जो धर्म सत्य असतो तो लोकांना सांगितला तर लोक त्याचा स्वीकार करतील पण भीतीतून निर्माण केला जाणाऱ्या धर्माबद्दल केव्हा ना केव्हा खरे कळणारच आहे. त्यामुळे सत्य धर्माचे पालन करणे लोकमाणसांना आवडते. त्यात कोणताही खोटेपणा असत नाही आणि ती वाट जीवन उन्नतीची असते. म्हणून धर्माच्या संदर्भाने जेव्हा काही उभे राहते तेव्हा आरंभी लोक खोट्या बाजूने उभे राहतील पण भविष्यात ती वाट नाकारतील हेही खरे! ■■

# 'तू है तो'





रमा जाधव
कोल्हापूर
८००७९९७२२३


**Mr. & Mrs. Mahi** मधील हे गाणं शब्दांनी जरी साधं भासतं तरी त्याच्या भावछटांमध्ये एक खोल, पाण्याखालचा प्रवाह आहे. ऐकताना जाणवतं, जणू एखादा भटका प्रवासी आपल्या पायाखालच्या वाटा विसरून गेला आहे; त्याला फक्त एकच दिशा ठाऊक आहे, 'ती'. काही शब्द मनाच्या अशा खोल कप्प्यात जाऊन विसावतात, जिथं वेळ थांबते, तर्क वितळतो आणि फक्त भावना उरतात. 'तू है तो दिल धड़कता है' ही केवळ प्रेमाची कबुली नाही तर जिवंत राहण्याचं कारण आहे. हृदयाची गती, श्वासांची लय, अस्तित्वाचं मर्म, सगळं तिच्या नावाने सुरू होतं, तिच्यानेच टिकून राहतं.

या गीतातला प्रियकर जणू आपल्या प्रेयसीवर फक्त प्रेम करत नाही तर तिच्या उपस्थितीतच श्वास घेतो, तिच्या अस्तित्वावरच जगतो. 'तू ना तो घर घर नाहीं लगता.' येथे 'घर' म्हणजे केवळ भिंती आणि छप्पर नाही तर तिच्या हाताचा स्पर्श, तिच्या डोळ्यातला ओलावा, तिच्या हसण्याने भारलेली हवा.

'तू है तो डर नहीं लगता, गम ना आते हैं' या ओळी प्रेमाचा खरा चमत्कार उलगडतात. प्रेम हे फक्त आनंद देणारं फूल नाही तर एक कवच आहे, जे भयाला बाहेरच रोखतं, दुःखाला दरवाज्याबाहेर थांबवतं आणि आत फक्त शांतता आणि विश्वासाचा प्रकाश ठेवतं. 'सौ जन्म भी कम क्यों लागे, तेरे साथ में' या भावनेत वेळेचं भान संपून जातं. तिच्या सोबतचा प्रत्येक क्षण अनंतासारखा भासतो आणि अनंतसुद्धा कमी पडतो. काळाचं चक्र जिथं थांबतं, तिथून या नात्याची खरी सुरुवात होते.

'मैं मुसाफिर, तू मुसाफिर' जीवनाच्या या प्रवासात अंतिम ध्येय काहीही असो, मार्ग सुंदर होतो कारण दोघे एकत्र चालतायत. इथे देवाचं घर म्हणजे दूर कुठला आकाशातील दरबार नाही तर तिच्या हाताची घट्ट पकड, तिच्या नजरेतलं शांत आश्वासन. शेवटच्या प्रतिमेत 'तू समुंदर गहरा है, सागर नहीं लगता', ही ओळ, ती केवळ खोल नाही तर असीम आहे. समुद्राला किनारा असतो, लाटांना मर्यादा असते; पण तिच्या गहिराईला मोजमाप नाही, तिला नाव नाही, ती फक्त अनुभवायची आहे.



एकूण हे गीत प्रेमाचं असं रूप दाखवतं, जिथं दोन मने एकमेकांत इतकी गुंफली जातात की बाकीचं विश्व धूसर होतं. प्रत्येक शब्द, प्रत्येक स्वर, ही फक्त भावना नाही ती हृदयाची थेट धडधड आहे. प्रेमाची ही अनुभूती कुठल्याही मोठ्या घटनांमध्ये नाही, तर रोजच्या श्वासांमध्ये, नजरेतून फिरणाऱ्या चेहऱ्यात आणि हाताच्या स्पर्शात दडलेली आहे. ■■

प्रति,



सोमवार, दि. २० ते २६ एप्रिल २०२६

साप्ताहिक चपराक www.chaprak.com

RNI No. MAHMAR/2011/35979

लिहिणाऱ्या हातांसाठी ‘चपराक’चे व्यासपीठ

साप्ताहिक ‘चपराक’साठी आपणही आपले साहित्य अवश्य पाठवू शकता. विविध विषयांवरील आपली मते, सामाजिक, राजकीय विषयावरील प्रासंगिक लेख, अनुभव, आपल्या परिसरातील विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या बातम्या असे साहित्य आमच्याकडे जरूर पाठवा.

**भ्रमणध्वनी :** ७०५७२९२०९२/८७६७९४१८५० **ई मेल :** info@chaprak.com

# ३३.५२ लाखांचे काम गेले तब्बल ८० लाखांवर

## आळंदी म्हातोबा सहित पंचक्रोशीचा जीवनवाहिनी पूल अजूनही कागदावरच

**सचिन माथेफोड**

लोणी काळभोर : आळंदी म्हातोबा परिसरासाठी तसेच शेजारील गावांसाठी जीवनवाहिनी मानला जाणारा आणि कुंजीरवाडी येथील नव्या उजव्या कालव्यावर उभारला जाणारा महत्त्वाचा पूल गेली अनेक वर्षे प्रत्यक्षात येण्याऐवजी केवळ कागदावरच फिरत असल्याचे वास्तव समोर आले आहे. २०१४ साली ३३.५२ लाख रुपयांची मंजुरी मिळालेल्या या पुलाचा खर्च आज तब्बल ८० लाखांच्या पुढे पोहोचला असला तरी प्रत्यक्षात मात्र काम सुरू झालेले नाही, ही बाबच आश्चर्यकारक ठरत आहे. तीन वेळा निविदा प्रक्रिया पूर्ण आणि सर्व प्रशासकीय मंजुरी असूनही कामाचा ठावठिकाणा नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या प्रकरणात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, या कामाचे कंत्राट बाहेरच्या तालुक्यातील ठेकेदाराला मिळाले असल्याची माहिती समोर येत आहे मात्र संबंधित ठेकेदाराकडून आजतागायत कामाला सुरुवात झालेली नाही. संबंधित ठेकेदारावर प्रशासनाचा किती अंकुश आहे हे सध्याच्या परिस्थितीवरून समजत आहे. तसेच संबंधित कंत्राटदार काम का सुरू करत नाही, कोणाच्या परवानगीची वाट पाहिली जात आहे हा एक प्रश्न गुलदस्त्यात आहे. प्रशासनाने यावर नेहमीप्रमाणे स्पष्टीकरण देत ‘कालव्याचे पाणी थांबल्यानंतर जून महिन्यात काम सुरू केले जाईल’ असे सांगितले असले तरी नागरिकांना हे कारण फारसे पटत नाही. कोणती कारणे दाखवून ३३ लाखांचा खर्च थेट ८० लाखांवर नेण्यात आला, याचे स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने व वारंवार खर्च का वाढला गेला याची ठोस कारणे न देता आल्याने ग्रामस्थांत उलटसुलट चर्चा सुरू आहेत.

दरम्यान, या प्रकल्पामध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याची कबुली काही अधिकाऱ्यांना संपर्क केला असता नाव न सांगण्याच्या अटीवर दिली गेली. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ‘पाणी थांबण्याची वाट पाहताना निधी मात्र का वाहतो?’ हा सवाल आता गावागावात चर्चेचा विषय ठरत आहे.

पुलाची सध्याची अवस्था अत्यंत धोकादायक बनली असून २०१४ पूर्वीपासून या पुलाची मागणी ग्रामस्थ वेळोवेळी करत आहेत. हा मार्ग केवळ स्थानिक गावांना जोडणारा नसून महामार्गाकडे जाणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. रोज हजारो नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थी या मार्गाने जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. अनेक अपघात होऊनही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आणि संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

फाईली पुढे सरकत राहतात, मंजुरी वाढत राहते, निधी वाढत राहतो; मात्र प्रत्यक्षात काम शून्यच अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. ‘पूल बांधणार की फक्त कागदावरच दाखवणार?’ आणि ‘जूनची तारीख अंतिम की आणखी एक आश्वासन?’ असे रोखठोक सवाल आता खुलेआम विचारले जात आहेत. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष जून महिन्याकडे लागले असून, खरोखरच काम सुरू होते की पुन्हा एकदा कारणांची नवी मालिका पुढे येते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



> २०१४ पासून ते आतापर्यंत मी तसेच माझ्या सोबत मा. उपसरपंच तेजस शिवरकर, शंकर जवळकर, गणेश जवळकर, पारस वाल्हेकर, कैलास खटाटे तसेच ग्रामपंचायत सदस्य व अनेक ग्रामस्थ या कामाचा पाठपुरावा करत आहोत. आज काम सुरू होईल, उद्या काम सुरू होईल असे करता करता १२ वर्षे कसे गेले हेच कळले नाही. आता तरी मायबाप प्रशासनाने जागे व्हावे. काय बजेट वाढवायचे तेवढे वाढवा, कंत्राट कोणाला द्यायचे त्यांना द्या पण एकदाचे पुलाचे काम करा म्हणजे आमच्या ग्रामस्थांसमोरची मोठी अडचण दूर होईल.
>
> – **आबासाहेब जवळकर,** माजी सरपंच, आळंदी म्हातोबा

> मी या ठिकाणी या पदावर रूजू झाल्यापासूनची माहिती तुम्हाला देऊ शकतो. त्यापूर्वी या कामाचे काय झाले याची मला कल्पना नाही. आज मी तुमच्या फोननुसार माहिती घेतली असता मे २०२६ पर्यंत पाटाचे आवर्तन असून त्यानंतर लगेचच कामाला सुरुवात करण्यात येईल. संबंधित कंत्राटदार ते सुरू करेल.
>
> – **किरण देशमुख,** कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग

